# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव

जिल्हा पेठ, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, जळगांव

दूरध्वनी क्रमांक ०२५७ २२३२३९० Email- deangmcjalgaon@gmail.com


## -: जाहिरात :-

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,जळगाव या संस्थेत जास्तीत जास्त रुग्ण रुग्णालयात योजनेतर्गत दाखल करण्याकरीता शिबिर आयोजित करणे आवश्यक असुन, महात्मा ज्योतिबा फूले जीवनदायी योजनेतुन दरमहा एकत्रित मानधनावर खालील तक्त्यात नमुद केलेले पद ११ महिन्याकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत. सदर पदाचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, तपशिल व अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय शिबिर समन्वयक (MCCO) | Masters in Social Work (M.S.W) सदर पदावर अनुभव | ०१ |

- **सर्वसाधरण अटी व शर्ती:-**

१) सदर नियुक्ती करताना उमेदवाराचे वय वर्ष १८ते ४५ वर्षा दरम्यान असावे.

२) सदर पदाचा अनुभव असणा-या उमेदवारास प्राध्यान्य देण्यात येईल

३) सदर पद निव्वळ तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपात ११ महिन्या करीता राहील.

४) सदर पदावर कायमचा सांगता येणार नाही.

५) शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणसंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

६) आवश्यक पात्रता असलेले उमेदवार न मिळाल्यास त्या पदाकरीता असलेली पात्रता अनुभव व अर्हता शिथील करण्याचे अधिकार निवड सतिने राखुन ठेवलेले आहे.

७) पदासाठी नमूद मानधन हे एकत्रित मासिक मानधन असेल.

८) अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसावा.

९) तात्पूरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर नियुक्ती करीता कोणताही राजकिय दबाब आणल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१०) मुलाखतीस उपस्थितीत राहताना उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे. कार्यालयामार्फत कोणताही प्रवासभत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही.

११) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार, उदा. भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्ती बदल करणे इ.सर्व अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव यांनी राखुन ठेवले आहे.

१२) तात्पूरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर नियुक्ती करीता कोणताही राजकिय दबाब आणल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१३) नियुक्ती मिळाल्यानंतर रुजु होताना वरिल सर्व नियम अटी शर्ती मान्य असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.

१४) वेतन दरमहा मानधन रु.२०,०००/- (अक्षरी विस हजार रुपये फक्त) इतके देण्यात येईल.

- **अर्ज सादर करण्याबाबत..**

अर्जदारास संस्थेच्या संकेतस्थळावर WWW.gmcjalgaon.org अर्जाचा नमुना उपलब्ध करुन देण्यात आलेला असून, उमेदवाराने अर्ज उपलब्ध (डाऊनलोड) करुन घ्यावा.सदर उमेदवाराने अर्जासोबत जन्मतारखेचा दाखला/पुरावा, शैक्षणिक अर्हता संदर्भात सर्व कागदपत्रे जसे पदवी/पदवीका/पदव्युत्तर अंतिम वर्षाची गुणपत्र, नावात बदल असल्यास त्याचे प्रमाणपत्र व तसेच आधार कार्ड व पॅन कार्ड इ. ची छायांकित प्रत साक्षांकित करुन विहित नमुन्यातील अर्ज अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जिल्हा पेठ, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, जळगांव येथे दि. २३/०६/२०२३ ते ३०/०६/२०२३ सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावा. अर्ज कार्यालयात जमा करतांना त्यासोबत अर्ज शुल्क रु.२००/- (अक्षरी दोनशे रुपये फक्त) कार्यालयातील रोखपाल शाखेत भरुन सदरील पावतीची मुळ प्रत अर्जासोबत सादर करण्यात यावी. उमेदवारांनी प्रत्यक्ष येवुन अर्ज कार्यालयात सादर करावा. ऑनलाईन अर्ज सादर करु नये ऑनलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही.

२) अर्जाची छाननी दि.०३/०७/२०२३ रोजी करण्यात येईल व दि.०४/०७/२०२३ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता यादी कार्यालयाच्या नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करण्यात येईल.

- **मुलाखत:-**

पात्र उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखत दि.०५/०७/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मुळ प्रमाणपत्रासह अधिष्ठाता, शा.वै.म.व रुग्णालय, जळगांव या संस्थेत उपस्थित राहावे.

- **रुजु अहवाल सादर करणे बाबत:-**

निवड झालेल्या उमेंदवाराने कामावर रुजु झाल्याचे अहवाल व्दिप्रतीत कार्यालयास सादर करावा.तसेच वेतना बाबत आवश्यक माहिती कागदपत्रे रुजु झाल्यानंतर लेखा-३ शाखा येथे सादर करावी, तसेच पात्रतेबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

(डॉ गिरीष ठाकुर)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
जळगांव.

प्रति:-
१) वैद्यकीय समन्वयक, म.ज्यो.फूले ज.आ.योजना,शा.वै.म.व,रु जळगांव
२) नोटीस बोर्ड, अधिष्ठाता यांचे सुचना फलक
३) रोखपाल, रोखपाल शाखा, शा.वै.म.व रु.जळगांव यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे व कालावधीत फॉर्म फी रुपये २००/- (अक्षरी दोनशे रुपये फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.

प्रत- मा.आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

# -: अर्जाचा नमुना :-

प्रति,
मा.अधिष्ठाता,
शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
जळगाव.

१) पदाचे नाव – ------------------------------------------

२) अर्जदाराचे नाव – ------------------------------------------

३) जन्म दिनांक – ------------------------------------------

४) पत्रव्यवहाराचा पत्ता – ------------------------------------------

------------------------------------------

५) कायमस्वरुपी पत्ता – ------------------------------------------

६) दुरध्वनी/भ्रमणध्वणी क्रमांक – ------------------------------------------

७) ई-मेल आय डी – ------------------------------------------

८) संगणकाचे ज्ञान – ------------------------------------------

९) शैक्षणिक अर्हता –

| अ.क्र. | शैक्षणिक आर्हता पदवीका/पदवी | विद्यापीठ/मंडळ/संस्थेचे नाव | शेवट वर्ष टक्केवारी | शेवट वर्ष श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) अतिरिक्त शैक्षणिक अर्हता –

(मागील पानावर)

कामाचा अनुभव

| अ.क्र. | संस्थेचे नांव | पदनाम | कालावधी | अनुभव वर्ष /महिना |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

## :- घोषणा पत्र:-

प्रमाणित करण्यात येते की, सदर जाहिरात मी संपुर्ण पणे वाचली असुन अर्जा सोबत जोडलेली माहिती मी स्वत: भरलेली आहे. मला पुर्णपणे जाणीव आहे की, कंत्राटी पध्दतीने --------------------------------------------- या पदाकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरीता नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पद योजनेच्या व्याप्ती प्रमाणे कमी / अधिक करण्यात येतील, ही नियुक्ती महात्मा ज्योतिबा फूले जन आरोग्य योजनेच्या कामकाजा करीता पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. यात काही चुक अथवा खोटी माहिती आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी माझ्यावर राहील. आपण घोषित केलेले सर्व अटी व शर्ती मला अवगत/ मान्य आहेत. करीता याबाबत मी घोषणा पत्र देत आहे.

नांव :-

दिनांक :-

ठिकाण :- स्वाक्षरी